**ठळक बातम्या**

- राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचं आरक्षण जाहीर
- रेल्वे पोलीस दलातली भरती कर्मचारी निवड आयोगाद्वारे करण्याची रेल्वेमंत्र्यांची घोषणा
- करुर चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी सीबीआयतर्फे करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश
- यंदाचा अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार जुएल मोकीर, फिलिप आगियों आणि पीटर हॉविट यांना जाहीर

**आणि**

- वेस्ट इंडिजविरुद्धची दुसरी कसोटी जिंकण्यासाठी भारताला ५८ धावांची गरज

**<><><><><>**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुकीसाठी आज विविध जिल्ह्यात आरक्षण सोडत जाहीर झाली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**---------व्हीसी--------**

*(पुणे जिल्हा परिषदेतल्या ७३ गटांपैकी सात जागा अनुसूचित जातीसाठी, पाच जागा अनुसूचित जमातीसाठी, तर १९ जागा इतर मागास प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नाशिक जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७४ पैकी ३७ गट महिलांसाठी राखीव आहेत, दहा जागा इतर मागास प्रवर्गातल्या महिलांसाठी, ९ जागा सर्वसाधारण प्रवर्गातल्या महिलांसाठी, १५ अनुसूचित जमातीतल्या*

*महिलांसाठी तर तीन जागा अनुसूचित जातीतल्या महिलांसाठी आरक्षित आहेत. सांगली जिल्हा परिषदेतल्या ६१ जागांसाठीही आरक्षण सोडत काढण्यात आली.*

*अहिल्यानगर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७५ गटांपैकी इतर मागास प्रवर्गासाठी २०, अनुसूचित जातीसाठी ७ तर अनुसूचित जमातीसाठी ९ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. नंदुरबारमधल्या ५६ गटांपैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी, ११ जागा इतर मागास प्रवर्गासाठी तर ४४ जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असतील. धुळे जिल्हा जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ५६ गटांपैकी २३ जागा अनुसूचित जमातीसाठी, ३ अनुसुचित जाती तसंच १५ जागा इतर मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत.*

*बीड जिल्हा परिषदेतल्या ६१ गटांपैकी सोळा गट इतर मागास प्रवर्गासाठी ऱाखीव आहेत, यातील आठ गट महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.  छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेतल्या ६३ जागांपैकी १७ जागा इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. तर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आठ जागा राखीव आहेत.)*

**<><><><><>**

एसटी महामंडळाच्या ८५ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून सहा हजार रुपये सानुग्रह अनुदान तसंच सणाची उचल म्हणून साडे बारा हजार रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. एसटी कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक मुंबईत आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. साडे सहा हजार पगारवाढीची थकित रक्कम देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी ६५ कोटी रुपये खर्च येणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आरपीएफ अर्थात रेल्वे पोलीस दलातल्या पदांसाठी यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भर्ती केली जाईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथे रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी त्यांनी आरपीएफशी संबंधित विविध उपक्रमांचा प्रारंभ केला. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांकडे आता अत्याधुनिक उपकरणं दिली जातील, तसंच त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी त्यांना प्रगत प्रशिक्षण दिलं जाईल, अशी घोषणाही रेल्वे मंत्र्यांनी यावेळी केली....

**होल्ड- रेल्वेमंत्री**

कमी उत्पन्न असलेल्या गटांच्या कल्याणासाठी रेल्वे सेवा वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी अश्विनी वैष्णव यांनी केला. येत्या दिवाळी आणि छट पूजेसाठी रेल्वे १२ हजार विशेष गाड्या चालवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सेवेच्या बिलिमोरा या स्थानकालाही अश्विनी वैष्णव यांनी भेट दिली आणि तिथल्या कामाचा आढावा घेतला. बुलेट ट्रेन सेवेचा बिलीमोरा ते सूरत हा पहिला टप्पा २०२७ मध्ये कार्यान्वित होईल, अशी माहिती यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ मनसुख मांडविय यांनी आज ‘विश्वास’ ही योजना सुरु केली. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण तरतुदी कायद्यांतर्गत दंडात्मक नुकसानभरपाई सुसंगत करुन खटले कमी करण्याचं या योजनेचं उद्दिष्ट आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाची २३८ वी बैठक आज नवी दिल्लीत झाली. या बैठकीत मांडविय यांनी या योजनेबरोबरच विविध डिजिटल उपक्रमांचा प्रारंभ केला.

**<><><><><>**

आयआरसीटीसी घोटाळ्यात राजदचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी, मुलगा तेजस्वी यादव यांच्यावर दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या तिघांसह अन्य आरोपींवर भ्रष्टाचार, गुन्हेगारी कट आणि फसवणुकीचे आरोप निश्चित केले आहेत.

रेल्वेमंत्री असताना लालू प्रसाद यादव यांनी आणि त्यांच्या कुटुंबाने २००४ ते २००९ दरम्यान एका खासगी कंपनीला कंत्राट देण्यासाठी जमिनीच्या स्वरुपात लाच स्वीकारल्याचा आरोप सीबीआयनं केला आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता आणि राजकीय नेता विजय यांच्या करूर इथल्या जाहीर सभेत झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फत करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. तामिळनाडूत करूर इथं गेल्या २७ सप्टेंबरला विजय यांच्या तमिळगा वेत्री कळगम- TVK पक्षाच्या जाहीर सभेच्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकाकडून करण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयानं दिले होते. या आदेशाला TVK पक्षानं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<><><><><>**

कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. भारत-कॅनडा द्विपक्षीय भागीदारीला नवीन गती देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांसाठी ही भेट महत्त्वाची असल्याची भावना प्रधानमंत्र्यांनी त्यांचं स्वागत करताना व्यक्त केली.

**<><><><><>**

२०२५साठीचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार जुएल मोकीर, फिलिप आगियों आणि पीटर हॉविट यांना जाहीर झाला आहे. तंत्रज्ञान किंवा नवोन्मेषामुळं कशारितीनं आर्थिक प्रगती होऊ शकते याबद्दल मोकीर यांनी संशोधन केलं. त्यांना या पुरस्कारातली अर्धी रक्कम दिली जाईल. उर्वरित अर्धी रक्कम इतर दोघांमध्ये वाटली जाईल. नवीन वस्तू किंवा तंत्रज्ञान बाजारात आल्यावर जुन्या गोष्टी बाजारपेठेतून काढून टाकल्या जातात. याविषयावर आगियो आणि हॉविट यांनी लेख लिहिला होता. त्याबद्दल हा पुरस्कार दिला जात असल्याचं नोबेल समितीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

गाझा आणि इस्रायल यांच्यातल्या युद्धबंदी करारानुसार पहिल्या टप्प्यात २० ओलिसांना हमासने इस्रायलकडे सुपूर्द केलं. या बदल्यात इस्रायल वीस हजार पॅलिस्टिनी नागरिकांना सोडणार आहे. यासंदर्भातल्या इतर घडामोडी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(इस्रायली ओलिसांच्या सुटकेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. ओलिसांच्या कुटुंबीयांचं धैर्य, शांतता प्रस्थापित करण्यासाठीचे डोनाल्ड ट्रम्प यांचे प्रयत्न तसंच इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांचा दृढ संकल्प यामुळे ओलिसांची सुटका झाली असं मोदी म्हणाले.*

*अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आज इस्रायलची राजधानी तेल अविवमधे पोहोचले, तिथे त्यांनी ओलिसांशी संवाद साधला तसंच इस्रायली संसदेला संबोधित केलं. त्यानंतर ते शांतता परिषदेत सहभागी होण्यासाठी इजिप्तला रवाना झाले. या परिषदेत वीस देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या परिषदेला इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू हे उपस्थित राहणार नाहीत. युद्धबंधीसाठी महत्त्वाची भूमिका निभावल्याबद्दल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प*

*यांना इस्रायलचा सर्वोच्च नागरी सन्मान इस्रायली प्रेसिडेन्शियल मेडल ऑफ ऑनरनं जाहीर झाला आहे. इस्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्जोग ट्रम्प याना हा पुरस्कार प्रदान करतील. या आधी हा सन्मान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना प्रदान करण्यात आला होता. )*

**<><><><><>**

वेस्ट इंडिजविरुद्धचा दुसरा कसोटी सामन्यात विजयासाठी भारताला आणखी ५८ धावा कराव्या लागणार आहेत. फॉलोऑननंतर आज चौथ्या दिवशी वेस्ट इंडिजनं पहिल्या डावातली पिछाडी भरून काढली, आणि दुसऱ्या डावाअखेर १२० धावांची आघाडी घेतली. कालच्या २ बाद १७३ धावावरून वेस्ट इंडिजनं आज पुढं खेळायला सुरुवात केली. जॉन कॅम्पबेल आणि शाई होप यांनी तिसऱ्या गड्यासाठी १७७ धावांची भागीदारी करत वेस्ट इंडिजला डावाच्या पराभवाच्या नामुष्कीतून बाहेर काढलं. कॅम्पबेलनं ११५, तर शाई होपनं १०३ धावा केल्या. ३९० धावांवर त्यांचा डाव संपला. भारतातर्फे या डावात कुलदीप यादव आणि जसप्रित बुमराहनं प्रत्येकी ३, तर महंमद सिराजनं २ गडी बाद केले. आजचा खेळ थांबला तेव्हा दुसऱ्या डावात भारताच्या १ बाद ६३ धावा झाल्या होत्या. के एल राहुल २५, तर साई सुदर्शन ३० धावांवर खेळत होते.

**//<><><><><> //**